# अंकज्योतिष व वैवाहिक समाधान

■ मनीषा राक्षे ■

अंकज्योतिष हे संपूर्णपणे स्पंदनांवर आधारित शास्त्र आहे. म्हणजे आपली जन्मतारीख व जन्मापासून आपल्याला मिळालेले आपले नाव, याच दोन गोष्टी केवळ आपल्या अस्तित्वाशी निगडित असतात. आपली 'जन्मतारीख' व 'आपले नाव' हे कधीच बदलता येत नाही. आपण केवळ नावानेच ओळखले जातो. सर्व काही आपल्या नावातच आहे. हे आपल्याला मान्य करावेच लागेल.

कोणत्याही गूढ अनुभवामागे काही तरी कार्यकारण भाव असतोच. याचा अर्थ, ती घटना सत्य आहे किंवा असत्य आहे, हे शोधता आलेले नसते. प्रत्येक व्यक्तीला दोन मने असतात. एक 'जागृत मन' व दुसरे 'सुप्त मन'. दोन्ही मने एकमेकांना काही ना काही सांगत असतात. एखादी गोष्ट आपल्याला करायची आहे व त्या वेळेस आपली द्विधा मन:स्थिती असेल तर सुप्त मन जागृत मनाला सांगत असते, 'हे योग्य आहे व ते अयोग्य आहे.' म्हणजे दोन्ही मनांच्या विचारलहारी चाललेल्या असतात. सुप्त मनाची शक्ती विलक्षण असून, मेंदू विचारांची क्रिया करीत असताना, त्याचा विचारलहरी वातावरणात मिसळून ठरावीक तऱ्हेची स्पंदने निर्माण होत असतात. दोन सुप्त मनांची ही देवाण-घेवाण होत असते. म्हणजे कधी कधी मनात आपण एखाद्या गोष्टीचा विचार करतो. आणि तीच घटना एकदम आपल्या डोळ्यांसमोर येते. आपण एखाद्या व्यक्तीची आठवण काढली तर तीच व्यक्ती अचानक आपल्यासमोर येऊन उभी राहते, किंवा त्या व्यक्तीचा तरी आपल्याला फोन येतो. कधी-कधी अचानक आपले अनोळखी व्यक्तीबरोबर ही सूर जुळून जातात किंवा ठरावीक मित्रांबरोबर आप्तांबरोबर आपल्याला बरे वाटते किंबहुना आपल्याला त्या व्यक्तीबरोबर सुरक्षित वाटत असते. याचाच अर्थ असा की, अंकज्योतिषात तुमच्या नावातील स्पंदने तुम्हाला कशी मिळतात ते बघितले जाते. ती जरी व्यवस्थित मिळत नसतील तर आयुष्यात अडचणी येतात व ती तुमच्या भाग्यांकाबरोबर जुळवून दिली, तर तुमच्या आयुष्यात आमूलाग्र बदल घडतात.

अंकज्योतिषात १ ते ९ भाग्यांक असतात. १ ते ९ अंकांतच सर्व अंकशास्त्र सामावलेले आहे. १ ते ९ म्हणजे प्रत्येक अंकाचा एक-एक ग्रह आहे. अंकशास्त्रात एकूण चारतत्त्वे आहेत. १) अग्नी, २) पृथ्वी, ३) वायू, ४) पाणी, प्रत्येक व्यक्ती विशिष्ट तत्त्वाखाली जन्माला येत असते. त्यावरून त्या व्यक्तीची रास व ग्रह ठरतो.

अंकशास्त्रानुसार भाग्यांक व प्रारब्धअंक कसा बघायचा ते आपण बघू यात. उदा. आपण एका जन्मतारीख घेऊ. ३-४-१९७३. प्रथम ३ हा त्या व्यक्तीचा भाग्यांक असून प्रारब्ध अंक म्हणजे पूर्ण तारखेची बेरीज २७ येते. २+७ = ९ प्रारब्ध अंक ९ असून भाग्यांक ३ आहे. म्हणजे भाग्यांक ३ म्हणजे 'गुरु राशी स्वामी' व प्रारब्ध अंक ९ म्हणजे 'राशी स्वामी मंगळ' या दोन्ही ग्रहांची वैशिष्ट्ये या व्यक्तीमत्त्वे आहेत.

अंकज्योतिषामुळे आपणास अनेक गोष्टींचे ज्ञान होते व त्याचे मोठ्या प्रमाणात फायदेही होतात. ते पुढीलप्रमाणे

१) आपल्यातील गुण व दोष तसेच वैशिष्ट्येही समजतात.

२) शुभ वार, शुभ अंक, मित्र अंक, शुभ रत्ने, शुभ होरा समजते.

३) आरोग्यविषयक ज्ञान, तुमच्या शरीरावर कोणत्या आजाराचे स्वामित्व आहे ते समजते. आजारांवर योग्य उपाय करता येतो.

४) व्यवसाय, नोकरी तसेच व्यवसायांतील नावात बदल

५) आयुष्यातील महत्त्वाची वर्षे कोणती आहेत ते समजते.

६) शुभ दिवस, शुभ महिना, शुभ वर्षे समजतात.

७) अंककुंडली, हरवलेल्या गोष्टींचा शोध.

८) विवाहयोग, वैवाहिक साथीदार कसा निवडावा ते समजते.

आता आपण अंकशास्त्रानुसार विवाहयोग व वैवाहिक साथीदार निवड या विषयी सविस्तर माहिती बघू यात. आजच्या युगात लग्न जमणे ही एक समस्याच झाली आहे. लग्न ठरविताना प्रत्येकाला आपल्या तोडीचे स्थळ हवे असते. वधू किंवा वर दोघेही तडजोड करीत नाही. प्रत्येकाच्या अपेक्षा अवास्तव असतात. परंतु सर्वगुणसंपन्न असे कोणीच नसते. प्रत्येकात गुण / दोष असतात, हे विसरून चालेल का? तरीसुद्धा विवाहाचा विचार करताना शारीरिक सुदृढता, मानसिक गुण / दोष, सामाजिक / आर्थिक दर्जा इ. अनेक गोष्टींचा विचार करावा लागतो. कुंडलीशास्त्रात दोन व्यक्तींच्या कुंडल्या बघून त्या एकमेकींना पूरक आहेत की नाहीत याचा विचार केला आहे. अंकज्योतिषाद्वारे वैवाहिक मीलन सुखकार आहे किंवा नाही हे अतिशय सोप्या रितीने सांगता येते. दोघांनाही एकमेकांना समजून घेणे सोपे जाते. वैवाहिक साथीदारांना एकमेकांचा जीवनविषयक दृष्टिकोन समजून घेणे फार महत्त्वाचे आहे. ह्याचप्रमाणे साथीदारांच्या आवडी-निवडी, त्याचे कर्तृत्व, मुलांच्या जबाबदाऱ्या,

महत्त्वाकांक्षा, कार्यक्षमता इ. गोष्टींचा बोध करून घेणे महत्त्वाचे आहे. ह्या गोष्टी समजून न घेतल्यास पतीपत्नी म्हणून एकत्र राहणे दोघांनाही कठीण जाईल. असे होऊ नये म्हणून अंकज्योतिषानुसार उपाय केल्यास बऱ्याच वैवाहिक अडचणी दूर होतात. लग्न ठरविताना, आपल्या जन्मतारखेला म्हणजेच भाग्यांकाला जमू शकतील असे मित्र अंक, शुभ तारखा तसेच शुभ महिना, तसेच आकर्षण चौकोन यांचा ताळमेळ बघून वैवाहिक साथीदार निवडता येतो. तसेच विवाह झालेले लोक त्यांच्या वैवाहिक जीवनात असंतुष्ट असल्यास त्यांच्या जन्मतारीख व नावातील स्पंदने त्यांच्या भाग्यांकाप्रमाणे जुळतात की नाही बघून तसेच जन्मतारीख एकमेकांना पूरक असूनही त्यांच्या जीवनात सुख नांदत नसेल तर पती-पत्नींच्या नावातील स्वर ह्यांचा अभ्यास करून त्यांच्या नावातील सोईस्कर बदल करून दिल्यावर बदललेले नाव रोज पानभर लिहिल्यास त्यांच्या मानसिक पातळीवर तरी दोघांमध्ये सख्य निर्माण होते. वैवाहिक साथीदार निवडताना त्याची जन्मतारीख लक्षात घेऊन निवड केल्यास दोघांचे वैवाहिक जीवन आंनदाचे व सुखाचे जाईल. दोघांच्या नावातही जरूर भासल्यास योग्य तो फरक करून एकमेकांतील सामंजस्य वाढविल्यास आनंदी जीवन जगता येईल. अशा प्रकारे अंकज्योतिष माध्यमातून विवाह जमविणे व टिकविणे सोपे जाते.

शेवटी असे म्हणावेसे वाटते की, प्रत्येक व्यक्तीचा जन्माचा क्षण व मृत्यूचा क्षण ठरलेला असेल तर या दोन्ही क्षणांना जोडणारे मधले अनेक क्षण यांचीही वेळ ठरलेलीच असणार हे तर्काला पटणारे आहे. यामुळेच पूर्वीच्या विद्वानांनी प्रत्येकाचा त्याचा अंक ठरवून दिला. एवढेच नव्हे तर प्रत्येक अंकाला काही व्यक्तिमत्त्व आहे. ठरावीक वैशिष्ट्ये आहेत. अंकज्योतिषामुळे आपणास अनेक गोष्टींचे ज्ञान होते व फायदेही होतात. आपण आपले स्वत:चे आत्मपरीक्षण करू शकतो. आपल्या अस्तित्वाची जाणीव होते. व्यक्तिमत्त्वविकास होतो. आत्मविश्वास वाढतो. कोणतीही आपत्ती संकट वाटत नाही. आपण येणाऱ्या आपत्तींवर सहज मात करू शकतो.

जन्मानंतर प्रत्येक व्यक्तीला विशिष्ट नावाने संबोधले जाते. प्रत्येकालाच आपल्या नावाचा अभिमान असतो. मात्र काही वेळा आपल्या नावातल्या थोड्याशा बदलाचाही आधार घ्यावा लागतो. अंकशास्त्राने आपल्यालाही संधी उपलब्ध करून दिली आहे. आपल्या नावाच्या इंग्रजी अक्षरांमध्ये काही बदल करून विविध क्षेत्रांतल्या लोकांनी आजपर्यंत या सुविधेचा लाभ घेतला आहे. जर आपणांस एखादी अडचण असल्यास आपण स्वत: काही नावात बदल करू नये. आपण अंकज्योतिष सल्लागाराची भेट घ्यावी.

शेवटी मेहनत व चिकाटीने फळ मिळतेच. परंतु ‘ अंकज्योतिषाने ’ मार्ग सुकर होतो. ■